निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (गट-ब) या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्रमांक:- इएसटी-१२१७/प्र.क्र.८७/राउशु-१,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०४ मे, २०१८.

शासन आदेश -

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या(५)४ मधील तरतुदीनुसार राज्य उत्पादन शुल्क विभागातील निरीक्षक, (गट-ब) या संवर्गातील खालील अधिकाऱ्यांच्या, सक्षम प्राधिकाऱ्यांच्या पूर्व मान्यतेने विनंती / प्रशासकीय कारणास्तव बदल्या करण्यात येत असून, त्यांची पदस्थापना खालील स्तंभ (५) मध्ये दर्शविलेल्या पदावर करण्यात येत आहे.

अक्.र	अधिकाऱ्याचे नाव	सध्याचे पद	वाटप झालेला महसूली विभाग	नवीन पदस्थापना	शेरा
१	२	३	४	५	६
१	श्री. राजाराम प्रभु शेवाळे	भरारी पथक, कोल्हापुर	पुणे	'ई' विभाग, पुणे	रिक्त पदी
२	श्री. संभाजी संतु बरगे	आंबाजोगाई, बीड	औरंगाबाद	भरारी पथक, कोल्हापूर	श्री. शेवाळे यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदी
३	श्री.समीर एल. पाटील	अ विभाग, सोलापूर	पुणे	'सी' विभाग, पुणे	रिक्त पदी
४	श्री. संजय एस. भोसले	भरारी पथक क्र. २, मुंबई उपनगर	कोकण	'जे' विभाग, मुंबई	रिक्त पदी

२. उपरोक्त रकान्यातील अधिकाऱ्यांना “महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०१५” मधील तरतूदी लागू असून या अधिकाऱ्यांना वाटप झालेल्या महसूली विभागामध्ये विहित कालावधी पूर्ण करणे आवश्यक आहे. अ.क्र. २ येथील अधिकाऱ्याचा महसूली विभाग वाटप या नियमांतील तरतूदीनुसार औरंगाबाद ऐवजी पुणे याप्रमाणे बदलून देण्यात येत आहे.

३. बदलीचे हे आदेश अंमलात येतील. बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली नंतरच्या पदस्थापनेचा कार्यभार तात्काळ स्वीकारावा. बदली आदेशाची अंमलबजावणी कार्यक्षमरित्या होण्याकरिता आयुक्त, राउशु यांनी खालील सूचनांचे पालन करावे

अ) बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर बदली झालेल्या अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करावे. बदली झालेले अधिकारी त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त होऊन रुजू होण्यासाठी आल्यानंतर त्यांना विनाविलंब रुजू करून घ्यावे. सदर अधिकाऱ्याला रुजू करुन न घेतल्यामुळे काम न देता सक्तीचा प्रतिक्षाकाळ ठरवून वेतन व भत्ते देण्याचा प्रसंग उद्भवल्यास संबंधीत अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल.

ब) संबंधित अधिकाऱ्यांना नवीन नियुक्तीच्या जागी हजर होण्यासाठी कोणत्या दिनांकास कार्यमुक्त केले आणि ते नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास त्वरीत कळवावे.

४. बदलीच्या आदेशात बदल करून घेण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्याने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणूक समजून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल.

५. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०५०४१७३१३०८४२९ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shivaji Baburao Chavan

Digitally signed by Shivaji Baburao Chavan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9aa522e32450ec03b47343bc963097b0e134f043fb205f2e97595f145aaf4d73, serialNumber=b5ccfce8750c2a4b31ad76a42c0094dcbcc63834c3279619496c6858859c8594, cn=Shivaji Baburao Chavan
Date: 2018.05.04 17:35:23 +05'30'

(शिवाजी चव्हाण)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति:

१) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,
३) सर्व विभागीय उपायुक्त, राज्य उत्पादन शुल्क (मार्फत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.)
४) जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद/पुणे/कोल्हापूर.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (मार्फत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.)
७) संबंधित अधिकारी (मार्फत आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) निवडनस्ती (राउशु-१)

प्रत माहितीस्तव

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. मंत्री (राउशु) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (राउशु) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.